**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Chhatrapati Sambhajinagar – 431 004,
Maharashtra, India
NAAC Re-Accredited 'A+' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/ 119/ 115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (१) (२) (३) नुसार नवीन महाविद्यालय करीताचा शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/ई-८४०७८३, दिनांक १८ सप्टेबर, २०२५ नुसार पात्र संस्था / महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करीता नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता पात्र महाविद्यालयांकडुन **दिनांक ३० सप्टेंबर, २०२६** पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सादर करावयाचे विहित नमुन्यातील प्रस्ताव/आवेदनपत्र, शासन निर्णय परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Online Affiliation मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व प्रस्ताव (New College Permission System - NCPS) या ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहेत.

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (१) (२) (३) नुसार नवीन महाविद्यालय करीताचा शासन निर्णयातील अटी व शर्ती यांची पुर्तता करणाऱ्या पात्र संस्था / महाविद्यालयांनीच प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव सादर करावेत.

१) शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करीता नवीन महाविद्यालय करीताचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (New College Permission System - NCPS) ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली असून http://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. तसेच विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. नवीन महाविद्याल करीता ऑनलाईन शुल्क भरणा करणे करीता online.bamu.ac.in/affiliation या लिंकवर Ord. १५०, १५१ व १५२ नुसार भरणा करुन शासनाने दिलेल्या लिंकवर माहिती भरतांना ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या शुल्काचा तपशील जसे भरलेले शुल्क, UTR No. व दिनांक समाविष्ट करावा.

२) शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ अन्वये विहित केल्यानुसार नवीन विधी महाविद्यालय करीता रू.१५ लाख आणि पारंपारिक महाविद्यालय (उदा.कला, विज्ञान आणि वाणिज्य) करीता रुपये ७ लाखचे मुदत ठेव / एफ.डी. राष्ट्रीयकृत बँकेचे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

३) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावाची हार्डकॉपी दोन प्रतीमध्ये परिशिष्ट अ नुसार मुद्देनिहाय क्रमवार कागदपत्र जोडावीत. त्यास अनुक्रमणिका, अनु.क्र. द्यावा व पताका लावावेत. तसेच प्रस्तावासोबतच्या सर्व छायांकित पानांवर साक्षांकन करून दि.०३/१०/२०२६ पर्यंत विद्यापीठास सादर करावेत. **तसेच प्रस्तावाची सॉफ्टकॉपी पेनड्राईव्हसह सादर करण्यात यावी.**

४) विद्यापीठ अध्यादेश-१५०, १५१ व १५२ अन्वये विहित केल्यानुसार सर्व संबंधित संस्था / महाविद्यालयांनी विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. **सदरील शुल्क परत मिळणार नाही किंवा सदरील शुल्क ना परतावा असेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

५) **तसेच नवीन विधी महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत विधी महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांबाबत सोबत जोडलेल्या शासनाचे पत्र दि.२४.०८.२०२६ रोजीच्या पत्रानूसार कार्यवाही करण्यात यावी.**

६) प्रस्तुत प्रकरणी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक सर्व संबंधितांना लागू राहतील.

करिता प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (४) (क) व शासन निर्णय दि.१८ सप्टेंबर, २०२५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता नवीन महाविद्यालय सुरू करण्याकरीता उपरोक्त तरतुदींची परिपूर्तता करणाऱ्या पात्र संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव व विहित शुल्क भरून त्याची हार्डकॉपी सर्व पुरक कागदपत्रांसह ०२ प्रतिंमध्ये दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत शैक्षणिक विभागात सादर करावेत. वरील प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीमध्ये ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**संदर्भ क्र.** शैक्ष/संलग्न/एबीएम/२०२६-२७/5432-39 ==*==
**दिनांक** २८-०९-२०२६. ==*==
==*==

कुलसचिव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१) कक्षाधिकारी, मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.

२) मा.प्र-कुलगुरू महोदयांचे स्वीय सहायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.

३) अध्यक्ष / सचिव / प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था यांना माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.

४) मा. संचालक, युनिक विभाग यांना देउन कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत ऑनलाईन अर्ज व शुल्क सादर करण्यासाठीची माहिती विद्यापीठाच्या पोर्टलमध्ये उपलब्ध करून देण्यात यावी.

५) मा. वित्त व लेखाधिकारी, वित्त व लेखा विभाग, यांना एक प्रत देण्यात येऊन कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत ऑनलाईन शुल्क सादर करण्यासाठी बँक व युनिक यांचे समन्वयाने API व्दारे सदरील शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

६) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.

७) जनसंपर्क अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

स्वा/-

**कुलसचिव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर